महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
Website : www.ropune.org.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि/Intake approval/२०२४/ 3985 दिनांक : ०३.१०.२०२४

3 OCT 2024

प्रति,
प्राचार्य,
**शासकीय, अशासकीय अनुदानित, खाजगी विनाअनुदानित**
**पोस्ट एचएससी औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था,**
**पुणे विभाग.**

विषयः **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील बारावीनंतरचे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेश प्रक्रीयेसाठी संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..**

संदर्भः मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक क्रमांक १०/एनजीपी/प्रवेशक्षमता/औषधनिर्माणशास्त्र पदविका/२०२४/४७८ दिनांक ०३.१०.२०२४.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय परिपत्रकाचे अवलोकन करावे. बारावीनंतरचे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत माहिती तसेच त्यासोबतची संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या (https://approval24.dtemaharashtra.gov.in) या लिंकवर अद्ययावत करुन या विभागीय कार्यालयाकडे पडताळणी व प्रमाणित करण्यासाठी ऑनलाईन सादर करण्याकरिता **दि. ०९.१०.२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत मुदतवाढ** देण्यात आलेली आहे.

तरी उर्वरीत सर्व संस्थांनी अंतिम दिनांकापर्यंत न थांबता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन लवकरात लवकर आपल्या संस्थेची माहीती पडताळणी व प्रमाणित करुन घ्यावी. **ज्या संस्था प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अद्ययावत करणार नाहीत व या विभागीय कार्यालयाकडून प्रमाणित करुन घेणार नाहीत, अशा संस्थेचा समावेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

(मारुती जाधव)
सहायक संचालक (तां),
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रतः
१) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई (कार्यासन क्रमांक १०)
२) प्रोग्रॅमर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१०/४६५/४९२
ई-मेल – intake@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक / कालमर्यादित:

क्रमांक: १०/एनजीपी/प्रवेशक्षमता/औषधनिर्माणशास्त्र पदविका/२०२४/ ४७८ दिनांक: 3 OCT 2024

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील बारावीनंतरचे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थेतील अभ्यासक्रमांच्या प्रवेश क्षमतेची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत

संदर्भ : १. संचालनालयाचे परिपत्रक क्र.१०/एनजीपी/प्रवेशक्षमता/औषधनिर्माणशास्त्र पदविका/२०२४/४५४, दि.२०/०९/२०२४

२. संचालनालयाचे वेळापत्रक क्रमांक: तंशिसं/पदविका प्रवेश वेळापत्रक/२०२४/बारावी नंतरचे प्रथम वर्ष पदविका/औषधनिर्माणशास्त्र/४७३, दिनांक: ३०/०९/२०२४

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील बारावीनंतरचे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. संस्थाबाबतची औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांचेकडून संलग्नता / समकक्षता प्रदान केल्याची माहिती तसेच त्यासोबतची संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या https://approval24.dtemaharashtra.gov.in या लिंकवर अद्ययावत करून दि. ०३/१०/२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. शिखर परिषदेची मान्यता व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता या कागदपत्रांच्या अभावामुळे काही संस्थांनी माहिती अद्ययावत करण्याची कार्यवाही पुर्ण केलेली नसल्याचे दिसुन येत आहे. तसेच तंत्रशिक्षण संचालनालयाद्वारे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अंतिम गुणवत्ता यादी पर्यंतचे सुधारित वेळापत्रक संदर्भ २ अन्वये प्रसिद्ध केले आहे.

त्याअनुषंगाने औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रम राबविणा-या सर्व संस्थांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळमुंबई , संलग्नता/समकक्षता प्रदान केल्याची माहिती व प्रवेशक्षमता अद्ययावत करुन <u>दिनांक ०९.१०.२०२४ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत</u> ऑनलाईन पध्दतीने सादर करावी. तसेच संस्थांनी सादर केलेली माहिती संबंधित तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाद्वारे पडताळणी व प्रमाणित करुन घ्यावी. **<u>तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाद्वारे दिनांक ०९.१०.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत</u>** अद्ययावत करण्याची कार्यवाही पुर्ण करावी.

ज्या संस्था प्रवेशक्षमतेबाबतची माहिती अद्ययावत करणार नाहीत तसेच संबंधित तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालयाद्वारे प्रमाणित करुन घेणार नाहीत, अशा संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर, नाशिक व पुणे - त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व पदविका संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व अचूक माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर <u>दिनांक ०९.१०.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत</u> अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

२) का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई - यांना माहिती व कार्यवाहीसाठी

३) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ - यांना संलग्नता/समकक्षता प्रदान करण्याच्या अनुषंगाने उचीत कार्यवाहीस्तव.

*******